0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) दक्षता शाखेकडून दिनांक २४/१०/२०११ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७७/२०११/जा.८४५, दि.२५/१०/२०११, दि.०९/११/२०११, दि. ३०/११/२०११ व ०८/१२/२०११.

३) या कार्यालयाची "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/ प्र.क्र.७७/२०११/जा.८४६ दि.२५/१०/२०११.

४) टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६४०८ चे मालक, मोहम्मद कमालउद्दीन शेख यांचे टपालामार्फत प्राप्त झालेले दि.०२/११/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

५) पोलिस उपनिरिक्षक, काशिमिरा पोलिस ठाणे यांचे टपालामार्फत प्राप्त झालेले दि.२०/१०/२०११ व १३/१२/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.

६) टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६४०८ चे चालक राजेंद्र यादव यांचा दि.२२/११/२०११ रोजी नोंदविण्यात आलेला जबाब.

७) सुरेशकुमार दुबे यांचे दि.१३/१२/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

८) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७७/२०११/जा.१०१८, दि. १६/१२/२०११.

९) अ.शि.दु.क्र. २५ ड/१२६ चे प्राधिकारपत्रधारक केशवजी हिरजी पटेल व अ.शि.दु.क्र. ४२ ग/९१ चे प्राधिकारपत्रधारक संभाजी हंबीरराव सुर्वे यांचे स्वतंत्र लेखी निवेदने.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७७/२०११/जा. १०३४
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक :-२७/१२/२०११.

### आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १५/१०/२०११ रोजी या कार्यालयास खात्रीलायक बातमी मिळाली की, टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६४०८ मधून शासन नियंत्रीत दराचा गहू अनधिकृतपणे मुंबई - अहमदाबाद रोडने जाणार आहे. सदर मिळालेल्या बातमीची खात्री करण्यासाठी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी पंचासह रात्री १०:३० वाजता मुंबई अहमदाबाद हायवे वरील अहमदाबादकडे जाणाऱ्या रोडवर दहिसर टोलनाक्या पुढील गेट येथे सापळा

रचून वरील प्रमाणे टेम्पोचा शोध घेत असताना रात्री ११:१५ वाजताचे सुमारास टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६४०८ हा मुंबई अहमदाबाद हायवे रोडने अहमदाबादकडे जाणाऱ्या वाहिनीवरुन पुढे जाताना दिसला. त्यानुसार अधिकाऱ्यांनी खाजगी वाहनातून सदर टेम्पोचा पाठलाग करुन ११:३० वाजताचे सुमारास हॉटेल दिल्ली दरबार इन समोरील रोडवर सदरचा टेम्पो थांबवून टेम्पोमध्ये असलेल्या इसमास अधिकाऱ्यांनी त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव राजेंद्र दशरथ यादव, चालक असे असल्याचे सांगून त्यास टेम्पोमध्ये वाहतूक करत असलेला माल दाखविणेबाबत सांगितले असता, सदर टेम्पोमध्ये गहू असलेबाबत दिसून आले. सदरचा गहू कोठून आणला याबाबत त्याचेकडे विचारपूस करता त्याने सांगितले की, तो चालवित असलेल्या वरील टेम्पोचा मालक मोहम्मद कमालउद्दीन शेख याने त्यास मो.नं. ९६९९२३१८३२ वर फोन करुन फोनवरील व्यक्तीने बोलाविलेल्या ठिकाणी जाऊन गहू भरणेबाबत कळवून सदरचा गहू आच्छाड, तलासरी येथे पोहचविणे बाबत कळविले. त्यानुसार त्याने वरील क्रमांकावर फोन केला असता फोनवर बोलणाऱ्या इसमाने त्याचे नांव सुरेशकुमार दुबे असे असल्याचे सांगून त्याने प्रथम पुष्पापार्क, मालाड पूर्व येथील ब्रिजच्या खालील रोडवर बोलावून तेथे टेम्पोमध्ये गहू भरला. त्यानंतर अपनाबाजार, अंधेरी पश्चिमचे पुढे डाव्याबाजुने घेवून जाऊन तेथे टेम्पोमध्ये गहू भरला व सुरेशकुमार दुबे याने त्यास दिपक ट्रेडिंग कंपनी, शॉप नं. २, गोकुळ बिल्डिंग, शिंपोली, बोरीवली (प), मुंबई पावती क्र. १८६४ दिली. टेम्पोमध्ये एकूण २०० पोती गहू प्रत्येकी ५० कि.लो. असा एकूण १०,००० कि.ग्रॅ. गहू असून तो पावतीवरील नमूद पत्ता गोल्डन ग्रेन मिल प्रा.लि. आच्छाड येथे पोच करण्यास सांगितले आहे. त्यानुसार टेम्पोमधील गहू घेवून जात असले बाबत सांगितले.

पंचासमक्ष अधिकाऱ्यांनी सदर टेम्पोतील मालाची पाहणी केली असता सदर टेम्पोमध्ये शिधावाटप यंत्रणेचा शासन नियंत्रीत दराचा एकूण २०० बाचकी गहू प्रत्येक बाचके ५० किलो वजनाचे असा एकूण १०,००० कि.लो. गहू आढळून आला. वरील प्रमाणे गहू टेम्पोसह ताब्यात घेवुन चालकाकडे असलेल्या पावतीनुसार सदरहू गव्हाची शहानिशा करणेकामी पथकातील दोन अधिकारी यांना घटनास्थळी थांबवून अधिकाऱ्यांनी दिनांक १६/१०/२०११ रोजी सकाळी पावतीवरील पत्त्यावर जावून दिपक ट्रेडिंग कंपनीबाबत शहानिशा केली असता. सदरचा गाळा बंद स्थितीत होता व तेथे नवकार ऑप्टीकल कॅम्पुटराईज आय टेस्टिंग असा बोर्ड असलेबाबत दिसून आले. आजुबाजुचे दुकाने बंद असल्याने अधिक माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. सदर बाबत पंचासमक्ष सविस्तर पंचनामा केलेला आहे. त्यानंतर सदर टेम्पोचे चालकास शिधावाटप यंत्रणेवरील गव्हाची वाहतूक करणेबाबत कोणत्याही प्राधिकरणाने दिलेल्या परवाना अथवा कागदपत्रे सादर करण्यास सांगितले असता, अशाप्रकारे कोणतीही कागदपत्रे त्याचेकडे नसलेबाबत त्याने सांगितले.

तसेच चालकास सदरचा गहू भरुन देणारा इसम नामे सुरेशकुमार दुबे याचे मो.नं.९६९९२३१८३२ वर फोन केला असता, त्याने त्याचे नाव सांगून गव्हाबाबत विचारणा करता काहीएक उत्तर न देता फोन बंद केला.

वरील प्रकारावरुन सदरहू टेम्पोमधील गव्हाबाबत चालक राजेंद्र यादव याने सादर केलेले पावती बनावट आढळल्याने व टेम्पोतील गहूबाबत व वाहतूकीबाबत त्याचेकडे इतर कोणतेही कागदपत्र नसल्याने सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर व शिधावाटप यंत्रणेवर उपलब्ध असलेला शासन अनुदानीत दराचा गहू अनधिकृतपणे बेकायदेशिररित्या स्वतःच्या व इतर सह आरोपीतांचे फायद्यासाठी काळ्यांबाजाराने विकण्याच्या उद्देशाने वाहतूक होत असल्याचे सिध्द झाले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा गहू अनधिकृतपणे बेकायदेशिररित्या त्यांच्या फायद्यासाठी काळ्याबाजाराने विकण्याच्या उद्देशाने मालाड व अंधेरी येथून भरुन मुंबई अहमदाबाद हायवे रोडवरील अहमदाबाद बाजुकडे जाणाऱ्या रोडवर हॉटेल दिल्ली दरबार इन समोर वाहतूक करीत असता मिळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ (२) दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स रेशनिंग (सेकंड) ऑर्डर १९६६ चे कलम ३, ३(अ), ४, ५, ६ सह (३) दि बॉम्बे रेशनिंग एरिया शेडयुल कमोडिटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रिब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ३, ४ चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द काशिमिरा पोलिस स्टेशन, ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II १२२/२०११ दि.१६/१०/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टाटा कंपनीचा एलपीआई ९०९ मॉडेलचा ब्राऊन रंगाचा टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६४०८ | १ नग | १०,००,०००/- |
| २ | शिधावाटप यंत्रणेचा शासन नियंत्रीत दराचा गहू एकूण २०० बाचकी गहू प्रत्येकी ५० किलो. वजनाचे | १०,००० कि.लो. | २,००,०००/- |
| | | एकूण | १२,००,०००/- |

सबब, उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. ०८/११/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक ०८/११/२०११ रोजीच्या सुनावणीस टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६४०८ चे मालक मोहम्मद कमालउद्दीन शेख व चालक राजेंद्र दशरथ यादव हे उपस्थित होते. टेम्पो मालक मोहम्मद कमालउद्दीन शेख यांनी

त्यांचे लेखी निवेदन यापूर्वीच वाचावे क्र. ३ अन्वये टपालामार्फत सादर केल्याचे सांगितले. तसेच टेम्पो चालक राजेंद्र दशरथ यादव यांनी त्यांचे लेखी निवेदन पुढील सुनावणीस सादर करणार असल्याचे सांगितले. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि. २२/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६४०८ चे मालक मोहम्मद कमालउद्दीन शेख व चालक राजेंद्र दशरथ यादव हे उपस्थित होते. टेम्पो मालक मोहम्मद कमालउद्दीन शेख यांनी त्यांचे लेखी निवेदन यापूर्वीच टपालामार्फत सादर केल्याचे सांगितले. तसेच टेम्पो चालक राजेंद्र दशरथ यादव यांनी त्यांचे लेखी निवेदन या सुनावणीसही सादर केले नाही. तथापी टेम्पो चालक याने सुनावणीदरम्यान जप्त गव्हाचा साठा हा अंधेरी व मालाड येथील रेशन दुकानातुन भरल्याचे सांगितले. त्यानुसार सदर दोन्ही दुकानांची चौकशी व तपासणी करण्यासाठी या कार्यालयातील फिरते पथकास पाचारण करण्यात आले. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.०७/१२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.१३/१२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १३/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस सुरेशकुमार दुबे, यांनी उपस्थित राहुन त्यांचे लेखी निवेदन वाचावे क्र. ७ अन्वये सादर केले. अपनाबाजार अंधेरी येथील दुकानदार म्हणून रमेश रामजी रावरिया व पुष्पापार्क, मालाड येथील दुकानदार म्हणून रमेश रामलाल गुप्ता हे उपस्थित राहीले. तथापी त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले नाही. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित नव्हते.

प्रस्तूत प्रकरणी, टेम्पो क्र.एमएच-०४-ईवाय-६४०८ चे चालक राजेंद्र यादव यांनी दि.२२/११/२०११ रोजीच्या सुनावणीमध्ये जप्त गव्हाचा साठा अंधेरी (प) येथील अपनाबाजार जवळील तसेच कुरार विलेज, मालाड येथील अधिकृत शिधावाटप दुकानांतून उचल केल्याचे सांगितल्याने, या कार्यालयातील फिरते पथकातील शिधावाटप निरिक्षक यांनी केलेल्या चौकशीमध्ये गव्हाचा साठा अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड/१२६ तसेच अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४२ ग/९१ या दुकानातून भरल्याचे सांगितले आहे. सबब, अ.शि.दु.क्र. २५ ड/१२६ तसेच अ.शि.दु.क्र. ४२ ग/९१ या दुकानांचे प्राधिकारपत्रधारक यांना त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी वाचावे क्र. ८ अन्वये दि.१९/१२/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक १९/१२/२०११ रोजीची सुनावणी प्रशासकिय कारणास्तव रद्द करण्यात आल्याने पुढील सुनावणी दि.२०/१२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दि.२०/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड/१२६ चे प्राधिकापत्रधारक केशवजी हिरजी पटेल तसेच अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४२ ग/९१ चे प्राधिकारपत्रधारक यांच्या वतीने पुरुषोत्तम संभाजी सुर्वे हे उपस्थित होते व त्यांनी वाचावे क्र. ९ अन्वये त्यांचे स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

पोलिस उप निरिक्षक, काशिमिरा पोलिस ठाणे यांनी सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, नमूद गुन्ह्यात २०० पोती गहू प्रत्येकी पोती ५० किलो वजनाची जप्त करण्यात आली असून ते सध्या काशिमिरा पोलिस ठाण्याचे आवारात आहे. जप्त मुद्देमाल हा नाशवंत आहे. त्यामुळे पोलिस ठाण्यात तो ठेवणेकरिता सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने यातील जप्त मुद्देमाल हा मा. व्यवस्थापक, फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, गोडावून बोरीवली, मुंबई येथे ठेवण्याकरिता संबंधितांना आदेश होण्यास विनंती करुन सदरचा गहू सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत विल्हेवाट होवून येणारी रक्कम शासनजमा करण्याची विनंती केली.

टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६४०८ चे मालक, मोहम्मद कमालउद्दीन शेख यांचे टपालामार्फत प्राप्त दि.०२/११/२०११ रोजीच्या लेखी निवेदनात, तो सदर ट्रकचा मालक असून सदरचा ट्रक हा काशिमिरा पोलिस ठाणे येथे गुन्हे नोंद क्र. III १२२/११ मध्ये जप्त करण्यात आलेला आहे. सदरचा गाडी मालक म्हणून त्यास काशिमिरा पोलिस ठाणे येथे अटक केली होती व मा. न्यायालयाने त्यास जामिनावर सोडलेले आहे. सदरच्या ट्रकमधील जप्त मुद्देमाल गव्हाचे पोते किंमत रुपये दोन लाख रकमेचा भरणा भाईंदर शिधावाटप केंद्र येथे काशिमिरा पोलिस ठाणे यांचे मार्फत करण्यात आलेला आहे. सदरच्या ट्रकमधील माल रिकामी करुन पोलिस ठाणेच्या आवारात उभा केलेला आहे. सदरचा ट्रकचा वापर तो ट्रान्सपोर्ट व्यवसायासाठी करीत असल्याने त्याच्या कुटुंबाचा आधार म्हणून सदरचा ट्रक त्याच्या ताब्यात देण्यात यावा, अशी विनंती कलेली आहे.

दि.१३/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित सुरेशकुमार दुबे यांनी युक्तीवाद केला की, तो वाशी मार्केटमधून तांदूळ व गहू घेवून दुकानदारांना (किराणा) वितरीत करीत असून त्याला दिनांक १५/१०/२०११ रोजी पुष्पापार्क, मालाड येथील दुकानदाराने व अपनाबाजार जवळ, अंधेरी (पश्चिम) येथील दुकानदाराने त्याला फोनद्वारे सुचित केले की, त्यांचेकडे गहू व तांदुळाचा साठा आहे. त्याने हा माल हवा असल्याचे त्यांना सांगितले. त्यानुसार त्याने बोरीवली नाक्यावरुन गाडी नंबर एमएच-०४-ईवाय-६४०८ या गाडीच्या ड्रायव्हरला फोन करुन पुष्पापार्क, मालाड, मुंबई व अपनाबाजार जवळ, अंधेरी, मुंबई येथून गहू व तांदळाचा माल घेवुन येण्यास सांगितले.

त्याप्रमाणे सदर ड्रायव्हर राजेंदर यादव याने सदरचा माल घेतला व त्याने त्याला सदर माल आच्छाड येथे पोहचविण्यास सांगितले. परंतू आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी/कर्मचाऱ्यांनी सदर गाडी काशिमिरा या ठिकाणी पकडली व केस नोंद केली. त्यानंतर त्यांने ठाणे कोर्टातून जामिन मिळविला. पुष्पापार्क, मालाड, मुंबई व अपनाबाजार जवळ, अंधेरी (प) या दोन्ही लोकांनी (व्यापाऱ्यांनी) सदरचा माल कसला होता, याबाबत त्याला कोणत्याही प्रकारे कळविले नव्हते. तरी सदर प्रकरणात त्याचा कोणताही दोष नसल्याने त्याला या प्रकरणातून मुक्त करण्यात यावे, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस टेम्पो क्र.एमएच-०४-ईवाय-६४०८ चे चालक राजेंद्र यादव यांनी सुनावणी दरम्यान जप्त गव्हाचा साठा अंधेरी (प) येथील अपनाबाजार जवळील तसेच कुरार विलेज, मालाड येथील अधिकृत शिधावाटप दुकानांतून उचल केल्याचे सांगितल्याने, या कार्यालयातील फिरते पथकातील शिधावाटप निरिक्षक यांनी तसा जबाब नोंदवून घेतला. राजेंद्र यादव यांनी दिलेल्या जबाबात, "सदर गुन्ह्यात पकडण्यात आलेला गहू कोठून भरला, याबाबत मा. नियंत्रकांनी विचारणा केली असता सदरचा गहू त्याने मालाड व अंधेरी येथील रेशन दुकानातून भरल्याचे सांगितले. त्यानुसार या कार्यालयाच्या फिरत्या पथकातील शिधावाटप निरिक्षक यांच्या समवेत अंधेरी येथील नमूद पत्त्यावर नेवून जय भवानी स्टोअर्स, आकृती आरकेड, दुकान नं. १२, जे.पी. रोड, अंधेरी (पश्चिम) येथील अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड/१२६ तसेच मालाड येथील शॉप नं. १, जहिर चाळ, लक्ष्मण नगर, कुरार विलेज, मालाड (पूर्व) येथील अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४२ ग/९१ हे दुकान दाखवून या दोन्ही दुकानांवरुन गव्हाचा साठा त्यांच्या टेम्पोमध्ये भरला असल्याचे सांगितले."

दिनांक २०/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अ.शि.दु.क्र. ४२ ग/९१ चे प्राधिकारपत्रधारक संभाजी हंबीरराव सुर्वे यांच्या वतीने त्यांनी प्राधिकृत केलेले पुरुषोत्तम संभाजी सुर्वे यांनी दिलेल्या निवेदनात, दि.१५/१०/२०११ रोजी फिरत्या पथकाने जो गव्हाचा ट्रक पकडला आहे. त्यात त्यांच्या दुकानाचा माल त्यांनी दिलेला नाही. त्यांच्या दुकानाचा नंबर ड्रायव्हरचे कसा दिला तो त्यांना माहित नाही. जाणून बूजन त्याला गोवण्याचा प्रयत्न आहे. दुकानात त्याचा मुलगा बसतो. त्याच्यावर सर्व कुटुंबाचा भार आहे. तो व त्याची आई आजारी असते. मुलगी लग्नाची आहे. त्याचा मुलगा व तो आजपर्यंत दुकान व्यवस्थित चालवित आहेत. दुकान हे त्यांच्या कुटुंबाचे उदरनिर्वाहाचे साधन आहे. ती त्यांची रोजी रोटी आहे व अशा प्रकारचे काम ते करीत नाही असे नमूद केले आहे.

दिनांक २०/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अ.शि.दु.क्र. २५ ड/१२६ चे प्राधिकापत्रधारक केशवजी हिरजी पटेल यांनी युक्तीवाद केला की, ते सुरेश कुमार दुबे नामे व्यक्तीस ओळखत नसून त्यांनी सदर इसमाला गव्हाचा साठा दिलेला नाही. शिधावाटप दुकानातील जिन्नस ते वैध असलेल्या शिधापत्रिका व्यतिरिक्त

कोणालाही विकत नसून ड्रायव्हरने केलेले आरोप हे निराधार आहेत. तसेच त्यांच्या रेशन दुकानाजवळ १ दुकान असून तेथील रमेश रावरिया या नावाच्या व्यक्तीने सदर गव्हाचा साठा जप्त टेम्पोमध्ये दिला असल्याचे कबूल केले. सदर प्रकरणी टेम्पोचे ड्रायव्हरने चुकीची माहिती दिली असून ते निर्दोष असल्याने त्यांना या आरोपातून मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक १५/१०/२०११ रोजी या कार्यालयाच्या फिरते पथकाने मुंबई - अहमदाबाद रोडने जाणाऱ्या टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६४०८ मधून हॉटेल दिल्ली दरबार इन समोरील रोडवर थांबविलेल्या टेम्पोमधील इसम नामे राजेंद्र दशरथ यादव, या चालकास सदर टेम्पोमधील असलेल्या शासननियंत्रीत गहु कोठून आणला याबाबत त्याचेकडे विचारपूस करता त्याने सांगितले की, तो चालवित असलेल्या वरील टेम्पोचा मालक मोहम्मद कमालउद्दीन शेख याने त्यास मो.नं. ९६९९२३१८३२ वर फोन करुन फोनवरील व्यक्तीने बोलाविलेल्या ठिकाणी जाऊन गहू भरणेबाबत कळवून सदरचा गहू आच्छाड, तलासरी येथे पोहचविणे बाबत कळविले. त्यानुसार त्याने वरील क्रमांकावर फोन केला असता फोनवर बोलणाऱ्या इसमाने त्याचे नांव सुरेशकुमार दुबे असे असल्याचे सांगून त्याने प्रथम पुष्पापार्क, मालाड पूर्व येथील ब्रिजच्या खालील रोडवर बोलावून तेथे टेम्पोमध्ये गहू भरला. त्यानंतर अपनाबाजार, अंधेरी पश्चिमचे पुढे डाव्याबाजुने घेवून जाऊन तेथे टेम्पोमध्ये गहू भरला व सुरेशकुमार दुबे याने त्यास दिपक ट्रेडिंग कंपनी, शॉप नं. २, गोकुळ बिल्डिंग, शिंपोली, बोरीवली (प), मुंबई पावती क्र. १८६४ दिली. टेम्पोमध्ये एकूण २०० पोती गहू प्रत्येकी ५० कि.लो. असा एकूण १०,००० कि.ग्रॅ. गहू असून तो पावतीवरील नमूद पत्ता गोल्डन ग्रेन मिल प्रा.लि. आच्छाड येथे पोच करण्यास सांगितले आहे. त्यानुसार टेम्पोमधील गहू घेवून जात असले बाबत सांगितले. वरील प्रमाणे गहू टेम्पोसह ताब्यात घेवुन चालकाकडे असलेल्या पावतीनुसार सदरहू गव्हाची शहानिशा करणेकामी पथकातील दोन अधिकारी यांना घटनास्थळी थांबवून अधिकाऱ्यांनी दि.१६/१०/२०११ रोजी सकाळी पावतीवरील पत्त्यावर जावून दिपक ट्रेडिंग कंपनीबाबत शहानिशा केली असता. सदरचा गाळा बंद स्थितीत होता व तेथे नवकार ऑप्टीकल कॅम्पुटराईज आय टेस्टिंग असा बोर्ड असलेबाबत दिसून आले. आजुबाजुचे दुकाने बंद असल्याने अधिक माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. सदर बाबत पंचासमक्ष सविस्तर पंचनामा केलेला आहे. त्यानंतर सदर टेम्पोचे चालकास शिधावाटप यंत्रणेवरील गव्हाची वाहतूक

करणेबाबत कोणत्याही प्राधिकरणाने दिलेल्या परवाना अथवा कागदपत्रे सादर करण्यास सांगितले असता, अशाप्रकारे कोणतीही कागदपत्रे त्याचेकडे नसलेबाबत त्याने सांगितले. तसेच चालकास सदरचा गहू भरुन देणारा इसम नामे सुरेशकुमार दुबे याचे मो.नं.९६९९२३१८३२ वर फोन केला असता, त्याने त्याचे नाव सांगून गव्हाबाबत विचारणा करता काहीएक उत्तर न देता फोन बंद केला. वरील प्रकारावरुन सदरहू टेम्पोमधील गव्हाबाबत चालक राजेंद्र यादव याने सादर केलेले पावती बनावट आढळल्याने व टेम्पोतील गहूबाबत व वाहतूकीबाबत त्याचेकडे इतर कोणतेही कागदपत्र नसल्याने सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर व शिधावाटप यंत्रणेवर उपलब्ध असलेला शासन अनुदानीत दराचा गहू अनधिकृतपणे बेकायदेशिररित्या स्वतःच्या व इतर सह आरोपीतांचे फायद्यासाठी काळ्याबाजाराने विकण्याच्या उद्देशाने वाहतूक होत असल्याचे सिध्द झाले. अशाप्रकारे संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन एक टेम्पो व ५० किलो वजनाच्या २०० बाचकी गहू असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सुरेशकुमार दुबे यांनी सुनावणीचेवेळी केलेल्या खुलाशात, तो वाशी मार्केटमधून तांदूळ व गहू घेवून दुकानदारांना (किराणा) वितरीत करीत असून त्याला दिनांक १५/१०/२०११ रोजी पुष्पापार्क, मालाड येथील दुकानदाराने व अपनाबाजार जवळ, अंधेरी (पश्चिम) येथील दुकानदाराने त्याला फोनद्वारे सुचित केले की, त्यांचेकडे गहू व तांदुळाचा साठा आहे. त्यानुसार त्याने गाडी नंबर एमएच-०४-ईवाय-६४०८ या गाडीच्या ड्रायव्हरला फोन करुन पुष्पापार्क, मालाड, मुंबई व अपनाबाजार जवळ, अंधेरी, मुंबई येथून गहू व तांदळाचा माल घेवुन येण्यास सांगितल्याप्रमाणे सदर ड्रायव्हर राजेंदर यादव याने सदरचा माल घेतला व त्याने त्याला सदर माल आच्छाड येथे पोहचविण्यास सांगितले. पुष्पापार्क, मालाड, मुंबई व अपनाबाजार जवळ, अंधेरी (प) या दोन्ही लोकांनी (व्यापाऱ्यांनी) सदरचा माल कसला होता, याबाबत त्याला कोणत्याही प्रकारे कळविले नव्हते.

तथापी, टेम्पोचा चालक राजेंद्र यादव यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात, सुरेशकुमार दुबे या इसमाने त्याच्या टेंम्पोमध्ये स्वतः उपस्थित राहुन अंधेरी व मालाड येथील दोन्ही दुकानातुन एकुण २०० बाचकी गहु भरुन दिला व सदर गव्हाचा साठा त्यास दिपक ट्रेडिंग कंपनी, शिंपोली, बोरीवली (पश्चिम) या नावाची पावती क्र. १८६४ देवुन पावतीवरील नमुद पत्ता गोल्डन ग्रेन मिल प्रा. लि. आच्छाड येथे पोच करण्यास सांगितले. तसेच घटनास्थळी असलेल्या फिरत्या पथकाने दिपक ट्रेडिंग कंपनी, शॉप नं. २, गोकुळ बिल्डिंग, शिंपोली, बोरीवली (प), मुंबई या बिलावरील नमुद पत्यावर भेट दिली असता तेथे या नावाचे दुकान कार्यरत नसल्याचे आढळून आले.

टेम्पो क्र.एमएच-०४-ईवाय-६४०८ चे चालक राजेंद्र यादव यांनी सुनावणी दरम्यान जप्त गव्हाचा साठा अंधेरी (प) येथील अपनाबाजार जवळील तसेच कुरार विलेज, मालाड येथील अधिकृत शिधावाटप दुकानांतून उचल केल्याचे सांगितल्याने, या कार्यालयातील फिरते पथकातील शिधावाटप निरिक्षक यांनी तसा जबाब नोंदवून घेतला आहे. राजेंद्र यादव यांनी दिलेल्या जबाबात, सदर गुन्ह्यात पकडण्यात आलेला गहू कोठून भरला, याबाबत विचारणा

केली असता सदरचा गहू त्याने मालाड व अंधेरी येथील रेशन दुकानातून भरल्याचे सांगून या कार्यालयाच्या फिरत्या पथकातील शिधावाटप निरिक्षकासमवेत अंधेरी येथील नमूद पत्त्यावर नेवून जय भवानी स्टोअर्स, आकृती आरकेड, दुकान नं. १२, जे.पी. रोड, अंधेरी (पश्चिम) येथील अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड/१२६ तसेच मालाड येथील शॉप नं. १, जहिर चाळ, लक्ष्मण नगर, कुरार विलेज, मालाड (पूर्व) येथील अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४२ ग/९१ ही दुकाने दाखवून या दोन्ही दुकानांवरुन गव्हाचा साठा त्याने त्याच्या टेम्पोमध्ये भरला असल्याचे सांगितले.

अ.शि.दु.क्र. ४२ ग/९१ चे प्राधिकारपत्रधारक संभाजी हंबीरराव सुर्वे यांच्या वतीने त्यांनी प्राधिकृत केलेले पुरुषोत्तम संभाजी सुर्वे यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, दि.१५/१०/२०११ रोजी फिरत्या पथकाने जो गव्हाचा ट्रक पकडला आहे. त्यात त्यांच्या दुकानाचा माल त्यांनी दिलेला नाही, असे नमूद केले आहे.

तथापी त्यांनी सादर केलेल्या साठापुस्तकाचे अवलोकन केले असता माहे ऑक्टोंबर मध्ये गव्हांच्या रकान्यामध्ये दिनांक ०४/१०/२०११ ते ३०/१०/२०११ मध्ये मोठया प्रमाणावर खाडाखोड केल्याचे आढळून आले. तसेच दिनांक ०९/१०/२०११ अखेर ३४० किलो गव्हाचा साठा पुस्तकी शिल्लक दर्शवुन दिनांक १०/१०/२०११ व ११/१०/२०११ रोजी प्रारंभी शिल्लक अनुक्रमे ३३७० किलो व ३४०२ किलो अशा खोटया व काल्पनिक नोंदी घेऊन दिशाभुल केल्याचे आढळून आले आहे. सबब, साठा पुस्तकातील नमूद कालावधीतील दर्शविलेल्या विक्री बाबत साशंकता वाटते.

अ.शि.दु.क्र. २५ ड/१२६ चे प्राधिकापत्रधारक केशवजी हिरजी पटेल यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशामध्ये, ते सुरेश कुमार दुबे नामे व्यक्तीस ओळखत नसून त्यांनी सदर इसमाला गव्हाचा साठा दिलेला नाही. तसेच त्यांच्या रेशन दुकानाजवळ एक दुकान असून तेथील रमेश रावरिया या नावाच्या व्यक्तीने सदर गव्हाचा साठा जप्त टेम्पोमध्ये दिला असल्याचे त्याने कबूल केले आहे. सदर प्रकरणी टेम्पोचे ड्रायव्हरने चुकीची माहिती दिली असून ते निर्दोष असल्याचे नमुद केले आहे.

तथापी, त्यांनी सादर केलेल्या साठापुस्तकाचे अवलोकन केले असता दिनांक २०/११/२०११ ते २२/११/२०११ या कालावधीमधील गव्हाच्या रकान्यामध्ये व्हाईटनरचा वापर करुन खाडाखोड केल्याचे आढळून आले आहे. तसेच माहे जुन २०११ ते माहे नोव्हेंबर २०११ या कालावधीमध्ये प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या पंधरवाडयामध्ये गव्हाची विक्री अल्प प्रमाणात अथवा निरंक दर्शविले असुन सदरचा गव्हाचा साठा पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत न करता स्वत:कडे बाळगुन ठेवण्याचे प्रयोजन काय ? याबाबत साशंकता वाटते.

प्रस्तुत प्रकरणी अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक २५ ड १२६ व ४२ ग ९१ चे प्राधिकारपत्रधारकांनी केलेले खुलासे पहाता, जप्त केलेल्या गव्हाशी त्यांचा काहीही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. तथापी, टेम्पो

क्र.एमएच-०४-ईवाय-६४०८ चा चालक राजेंद्र यादव याने घटनास्थळी दिलेल्या जबाबानुसार त्याने अंधेरी व मालाड येथील नमूद दोन्ही अधिकृत शिधावाटप दुकानातुन सुरेशकुमार दुबे, जप्त गव्हाच्या साठयाचा खरेदीदार, यांच्या सांगण्यावरुन टेंम्पोमध्ये गव्हाचा साठा भरल्याचे तसेच त्याने सुनावणीच्या दरम्यान दिलेल्या जबाबानुसार अंधेरी व मालाड येथील अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक २५ ड १२६ व ४२ ग ९१ या दोन्ही रेशन दुकानातुन सदर गव्हाचा साठा भरल्याचे समक्ष दाखवुन दिले आहे. सबब, जप्त करण्यात आलेला गव्हाचा साठा हा दुकान क्रमांक २५ ड १२६ व ४२ ग ९१ या दोन्ही दुकानांचा असुन संबंधित प्राधिकारपत्रधारकांनी तो पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत न करता गैरव्यवहार करुन स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्यापासुन वंचीत ठेवले असल्याचे निष्पन्न होत आहे. तथापी, जप्त गव्हाच्या साठ्याबाबत कोणीही दावा केलेला नसुन, सद्य:स्थितीत माझ्यासमोर सकृतदर्शनी दिसून येत असलेल्या वस्तुस्थितीवरुन सर्व संबंधितांनी केलेले खुलासे मोघम स्वरुपाचे असून, आरोपी यांनी परस्पराशी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा शासन नियंत्रीत गहू बेकायदेशीररित्या व अवैधमार्गाने मिळवून त्याची जादा नफेखोरीच्या उद्देशाने खरेदी, विक्री व विनापरवाना वाहतूक केली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, जप्त गव्हाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले "क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७७/२०११/जा.८४, दिनांक २५/१०/२०११" चे अंतरिम आदेश कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

जप्त केलेला टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६४०८ चे मालक, मोहम्मद कमालउद्दीन शेख यांनी सादर केलेल्या खुलाशात ते सदर टेम्पोचे मालक असून सदरचा टेम्पो हा काशिमिरा पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक १२२/११ मध्ये जप्त करण्यात आलेला आहे. सदरच्या टेम्पो मधील माल रिकामी करुन पोलिस ठाणेच्या आवारात उभा केलेला आहे. सदरचा टेम्पोचा वापर तो ट्रान्सपोर्ट व्यवसायासाठी करीत असल्याने त्याच्या कुटुंबाचा आधार म्हणून सदरचा टेम्पो त्याच्या ताब्यात देण्याची विनंती केली आहे. टेम्पो मालकाचे अपरोक्ष जरी सदर वाहनाचा गैरवापर केला असला तरी वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, सदर टेम्पोवर त्यांच्या कुटुबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. ही बाब विचारात घेता, शासनाचे परिपत्रक क्र. जीवका-१००५/प्र.क्र.४३८/ना.पु.२३, दि. ३० ऑगष्ट, २००५ मधील निर्देशानुसार सदरचा जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६४०८ हा त्याच्या सद्याच्या बाजारमुल्याप्रमाणे येणाऱ्या एकुण किंमतीच्या ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर त्यांचे मालकास परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये काशिमिरा पोलिस

CONTROLLER OF RATIONING ... MUMBAI

स्टेशन, ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II १२२/२०११ दि.१६/१०/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) या कार्यालयाचे दि.२५/१०/२०११ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६४०८ हा त्याच्या सद्याच्या बाजारमुल्याप्रमाणे येणाऱ्या एकूण किंमतीच्या ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर त्याच्या मालकास परत करण्यात यावा.

३) सदरची बँक गॅरंटी या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत वेळोवेळी विहीत वेळेत नुतणीकरण करुन पोलिसांकडे देण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील.

४) या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत सदरहू वाहन विक्री करता येणार नाही व कोणासही हस्तांतरण करता येणार नाही.

५) तथापी, या वाहनाच्या मालकाने अशी बँक हमी सादर न केल्यास, सदर वाहनाची पोलिसांनी नियमानुसार जाहिर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६४०८ चे चालक, राजेंद्र दशरथ यादव
२) टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-६४०८ चे मालक, मोहम्मद कमालउद्दीन शेख
३) सुरेशकुमार दुबे
४) पुष्पापार्क, मालाड, मुंबई येथील दुकानदार

५) अपनाबाजार जवळ, अंधेरी (पश्चिम) येथील दुकानदार
६) दिपक ट्रेडिंग कंपनीचे मालक, शॉप नं. २, गोकुळ बिल्डिंग, शिंपोली, बोरीवली (प), मुंबई
७) गोल्डन ग्रेन मिल प्रा.लि. चे मालक, आच्छाड
८) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २५ ड/१२६ चे प्राधिकारपत्रधारक
९) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४२ ग/९१ चे प्राधिकारपत्रधारक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमिरा पोलिस स्टेशन, ठाणे यांचे मार्फत)

**प्रत,**

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, काशिमिरा पोलिस स्टेशन, ठाणे यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३) उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांनी उचित कारवाई करुन केलेल्या कारवाईचा अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

४) उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांनी उचित कारवाई करुन केलेल्या कारवाईचा अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

५) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

६) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.

७) कार्यासन अधिकारी, दुकान शाखा, का.क्र. १०, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित कार्यवाहीकरिता.

८) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING AND DIRECTOR OF CIVIL SUPPLIES

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.